महाराष्ट्र पोलीस

# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, **E Mail - pilcbnskr@gmail.com**

---

## प्रेसनोट

दिनांक :- ०२/०७/२०१८

**नाशिक ग्रामीण पोलीस दलातील जीपीएस वाहन प्रणाली व फिरते पोलीस ठाण्यांचे**
**मा.मुख्यमंत्री सो यांचे हस्ते उद्घाटन**

---

महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन व विकास समितीच्या नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे जीपीएस प्रणालीने सुसज्ज गस्ती पथकाच्या वाहनांचा व फिरते पोलीस ठाणे उपक्रमांचे आज रोजी ओझर विमानतळ परिसरात **महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस सो** यांचे शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमास **नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री तथा जलसंपदा व आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य मा.श्री.गिरीषजी महाजन सो.** यांचे प्रमुख उपस्थितीत, खासदार श्री. हरिश्चंद्र चव्हाण, आमदार श्री.बाळसाहेब सानप, श्रीमती देवयानी फरांदे, श्रीमती सिमा हिरे, महापौर श्रीमती रंजना भानसी, तसेच इतर राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. सर्व मंत्री महोदय व प्रमुख पाहुण्यांचे नाशिक परिक्षेत्राचे **मा.विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.श्री.छेरिंग दोरजे सो**, व नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी स्वागत केले. कार्यक्रम प्रसंगी नाशिक जिल्हयाचे मा.जिल्हाधिकारी श्री. राधाकृष्णन बी., नाशिक मनपा आयुक्त श्री.तुकाराम मुंढे यांचेसह प्रशासन व पोलीस दलातील इतर अधिकारीही उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यातील विविध शहरे व जिल्हे अंतर्गत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखणेची मुख्य जबाबदारी पोलीस दलाकडे असते, त्याचबरोबर राज्यातील वाहतुक नियमन करणेची कामगिरीही पार पाडावी लागते. जिल्हयात अचानक उद्भवलेली कायदा व सुव्यस्था परिस्थिती, तसेच मोटर अपघात, ट्रॅफिक जाम व नागरीकांच्या विविध तक्रारींसंदर्भात सुरक्षिततेची हमी वाढविणेसाठी कार्यक्षम पोलीसींग करणे व तंतोतंत कार्यवाहीसाठी जीपीएसच्या सहाय्याने संबंधीत ठिकाणापासुन जवळ असलेले पोलीस वाहनास त्वरीत प्रभावाने नागरीकांच्या मदतीसाठी पाठविता येणार आहे. अत्याधुनिक जीपीएस प्रणालीचे आधारे घटनेच्या ठिकाणापासुन जवळ असलेले पोलीस वाहन तात्काळ मदतीसाठी पाठविण्यात येणार असुन लागणारा वेळ कमी होणार आहे. सदर योजनेअंतर्गत ग्रामीण पोलीस दलातील महत्वाची वाहने, पोलीस ठाणे गस्ती वाहने, जिल्हा वाहतुक शाखेकडील वाहने, दरोडा प्रतिबंधक वाहने तसेच मुख्यालयातील लहान-मोठया **वाहनांवर जीपीएस बेस आधारीत सयंत्र** बसविण्यात आलेले आहे. वाहनावर बसविण्यात आलेले जीपीएसव्दारे पोलीस नियंत्रण कक्षातील संगणकांचे नकाशावर सदर वाहनाचे त्यावेळचे अचुक ठिकाणाची माहिती तसेच नजीकचे पोलीस ठाणे कुठले आहे याबाबत मिळणार असुन अचानक उद्भवलेली कायदा व सुव्यवस्था परिस्थिती, अपघात इत्यादी ठिकाणांवर त्या परिसरातील शासकिय वाहनास तात्काळ पोहोचण्यास सांगता येणार आहे. सदर अत्याधुनिक प्रणालीमुळे जनतेस अपघाताचे वेळेस, गंभीर गुन्हयात तसेच कायदा व सुव्यस्थेचे काळात अत्यंत जलद गतीने व अचुकतेने मदत पाठविणे शक्य होणार आहे.

तसेच महाराष्ट्र शासनाचे नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत अत्याधुनिक जीपीएस प्रणालीसोबत फिरते पोलीस ठाणे ही महत्वपुर्ण योजनाही ग्रामीण पोलीस दलातर्फे कार्यन्वीत करण्यात आली आहे. पोलीस दलाबद्दल असलेल्या गैरसमजुतीतून अनेक नागरीक, महिला लहान मोठया तक्रारी अथवा गुन्हे पोलीस ठाण्यात येवुन दाखल करण्यास इच्छुक नसतात. पोलीसांबद्दल असलेली भिती दुर करण्यासह नागरीकांच्या तक्रारींचे त्वरेने निराकण व्हावे, तसेच महिला अत्याचार, बॅंक व सोशल मिडीयाव्दारे होत असलेले फसवणुकीचे प्रकार, चैन स्नॅचिंग व जबरीचे लुटमारीचे गुन्हे असे प्रकार टाळण्यासाठी जिल्हयातील एकुण ४० पोलीस ठाणे अंतर्गत फिरते पोलीस ठाणे हा उपक्रम राबविण्यास प्रारंभ झाला आहे.

पोलीसांबद्दल गैरसमज असल्यामुळे लहान तक्रारी अथवा गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ केली जाते, मात्र नंतर या तक्रारीच गुन्हयाचे मोठे स्वरूप धारण करीत असतात. त्यामुळे जनतेशी थेट संवाद साधत त्यांच्या तक्रारी, गुन्हे दाखल करून घेत त्यांना न्याय मिळवुन देणे तसेच जनतेत असलेली पोलीसांबद्दलची भिती दुर करणे, ग्रामीण भागातील नागरीकांशी संवाद साधुन सलोख्याचे वातावरण तसेच अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन करणे इत्यादी कामांची अंमलबजावणी फिरते पोलीस ठाण्यामार्फतीने केली जाणार आहे. तसेच महिला सबलीकर हा प्रमुख उद्देश या उपक्रमामागे असुन महिला विषयक कायदे तसेच धोरणांची जनजागृतीचे कामही या पोलीस ठाण्यांमार्फत होणार आहे.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे आज रोजी वरीलप्रमाणे जीपीएस वाहन प्रणाली व फिरते पोलीस ठाणे असे दोन नवीन उपक्रमांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असुन सदर कार्यक्रम प्रसंगी मंत्रीमहोदयांचे प्रमुख उपस्थितीत नाशिक परिक्षेत्राचे विशेष मा.पोलीस महानिरीक्षक डॉ.छेरिंग दोरजे सो, मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो, पोलीस उपअधीक्षक श्री. अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश विभाग श्री. बी.आर.दुकळे, यांचेसह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.